# अर्थशास्त्र विभाग अहवाल

(सत्र : २०१८-१९)

**प्रा.डॉ.रवि एस.सोरते**

(अर्थशास्त्र विभागप्रमुख)

अर्थशास्त्र विभागाच्या वतीने १२ फेब्रुवारी २०१९ ला महाविद्यालयात **"अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन व विशेष व्याख्यान"** आयोजित करण्यात आले. या प्रसंगी उद्घाटक म्हणून नगर परिषद शिवाजी महाविद्यालय, मोवाड येथील अर्थशास्त्र विभाग प्रमुख **प्रा.डॉ. सतीश जाधव** उपस्थित होते. यांनी अर्थशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करुन ५ विद्यार्थ्यांचे अभ्यास मंडळ स्थापन करण्यात आले. अर्थशास्त्र अभ्यास मंडळ स्थापन करण्याचा उद्देश असा की, विद्यार्थीजीवनात त्यांना निर्माण होणाऱ्या समस्या सोडवून घेण्यासाठी तसेच विषयांशी संबंधित एखादया प्रश्नावर चर्चा घडवून आणणे व निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न असतो. विद्यार्थ्यांमध्ये अर्थशास्त्राची जागृकता व ज्ञान निर्माण करणे तसेच दैनंदिन आर्थिक घडामोडींचा अभ्यास जाणून घेण्याच्या दृष्टीने अर्थशास्त्र अभ्यास मंडळ महत्वाचे आहे.




या विद्यार्थ्यांच्या व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन सत्राअंतर्गत करण्याचे ठरले. या कार्यक्रमामध्ये बॅक व्हिजीट, औद्योगिक भेटी, बाजारपेठेला भेट, अंदाजपत्रक तयार करणे – अंदाजपत्रक वाचन करणे इत्यादी ठरले. प्रा.डॉ. सतिश जाधव यांनी आपल्या उद्घाटनपर मार्गदर्शनात विविध उपक्रम राबवावे, नुकताच पार पडलेला केंद्रीय अर्थसंकल्प २०१९ चा आपल्या जिवनात कसा उपयोग करुन घ्यावयाचा हे आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात सांगितले.

अर्थशास्त्र अभ्यास मंडळ स्थापन करीत असतांना विद्यार्थ्यांची कार्यकारणी गठीत करण्यात याच्यामार्फत संपूर्ण सत्रात विविध कार्यक्रम राबविण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | — | कु. निकीता वंजारी | बी.ए.भाग—३ |
| सचिव | — | श्री शुभम तीजारे | बी.ए.भाग—२ |
| सदस्य | — | कु. रितीका राऊत | बी.ए.भाग—२ |
| सदस्य | — | कु. पुष्पलता घुसे | बी.ए.भाग—१ |
| सदस्य | — | श्री सचिन सनतापे | बी.ए.भाग—१ |

सत्र २०१८—१९ मध्ये अर्थशास्त्र विभागाअंतर्गत विद्यार्थ्यांना ज्ञानप्राप्ती करुन देण्याच्या उद्‌देशाने वर्गामध्ये वादविवाद, सेमिनार तसेच पॉवर पॉइट प्रेझेंटेशन घेण्यात आले. विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये भर घालण्याच्या उद्‌देशाने अर्थशास्त्र विषयाशी संबधीत प्रतियोगिता साहित्य सिरीज (अर्थशास्त्र), अर्थसंवाद, योजना, कुरुक्षेत्र, अर्थमिमांसा, अर्थविश्व इ. मासिक व संदर्भ साहित्य पुस्तिका उपलब्ध करुन देण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री.सतिश चंदेल तसेच प्रा. नारायण बालपांडे नगर परिषद शिवाजी महाविद्यालय, मोवाड, अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. रवी सोरते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता प्रा. पवन महंत, प्रा.डॉ. नारायण पवार, प्रा.डॉ. समीर पाहुणे, प्रा.डॉ.सुधीर नारनवरे, प्रा.डॉ. रामेश्वर पाठेकर, प्रा. डॉ. श्वेता बाजपेयी, प्रा. प्रशांत सावरकर, प्रा.शिरीष खोबे आणि महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे तसेच वाणिज्य विभागाचे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.



तसेच अर्थशास्त्र अभ्यास मंडळाअंतर्गत महाविद्यालयात दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ ला ग्रंथालय माहितीशास्त्र व अर्थशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथालयातील **“स्पर्धा परिक्षांच्या पुस्तके तसेच अर्थशास्त्र विषयाच्या संदर्भ ग्रंथाचे प्रदर्शन”** भरविण्यात आले. सोबतच अंदाजपत्रक २०१९ या विषयवार बी.कॉम.भाग—१ च्या विविध विद्यार्थ्यांनी तयार केलेली **“केंद्रीय अंदाजपत्रक २०१९”** चे भित्तीचित्रे ग्रंथालयात प्रदर्शित करण्यात आली. या भित्तीपत्रकाच्या माध्यमातून भारतीय अंदाजपत्रकाचे संक्षिप्त स्वरुप विद्यार्थ्यांनी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. या प्रदर्शनीतून महाविद्यालयातील प्राध्यापकांना तसेच विद्यार्थ्यांना अंदाजपत्रक म्हणजे काय? ते कसे असतात? त्याचा आपल्या जिवनात कसा उपयोग करावा? याचे ज्ञान देण्याचा प्रयत्न या भित्तीपत्रकाच्या माध्यमातून देण्यात आला. यामध्ये महाविद्यालयातील संपूर्ण विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग नोंदविला.



ग्रंथप्रदर्शनी व भित्तीपत्रक प्रदर्शनीचे उद्घाटन नगर परिषद शिवाजी महाविद्यालय, मोवाड येथील अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. सतिश जाधव यांनी केले. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. रवी सोरते व ग्रंथालय विभाग प्रमुख सतिश चंदेल यांच्या मार्गदर्शनाअंतर्गत विद्यार्थ्यांनी **"ग्रंथप्रदर्शनी व भित्तीचित्र प्रदर्शनीचे आयोजन"** केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय चिकाटे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्रा.डॉ. विजय राऊत, प्रा.डॉ. सूधीर नारनवरे, प्रा.डॉ. सुधाकर पवार, प्रा.डॉ. समीर पाहुणे, प्रा.डॉ. श्वेता बाजपेयी, प्रा. पवन महंत, प्रा.डॉ. रामेश्वर पाठेकर, प्रा. प्रशांत सावरकर, प्रा. अशोक मदनकर, राहूल धुर्वे यांनी सहकार्य केले. ग्रंथप्रदर्शनी व भित्तीचित्र प्रदर्शनी विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमास सहाय्यक ठरावी अशी होती. या प्रदर्शनीचा लाभ महाविद्यालयीन सर्व विद्यार्थ्यांनी घेतला.



अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचा एक उपक्रम दिनांक ११/०१/२०१९ रोज शुक्रवारला श्री पंढरीनाथ कला व वाणिज्य महाविद्यालय नरखेड द्वारा बि.ए. व बी.कॉम. च्या विद्यार्थ्यांची **'चेतक पाईप कंपनी लिमिटेड'** नरखेड येथे औद्योगिक भेट (Industrial Visit) देण्यात आली. या औद्योगिक भेटीमध्ये बि.ए. व बी.कॉम. च्या २१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या भेटीमध्ये कॉमर्स विभागातील प्रा. डॉ. रवी सोरते, प्रा.डॉ. सुधीर नारनवरे, प्रा.डॉ. रामेश्वर पाठेकर, प्राध्यापिका डॉ. श्वेता बाजपेयी, प्रा. प्रशांत सावरकर इ. प्राध्यापकवृंद उपस्थित होते.



सुरुवातीला कंपनीत प्रवेश केल्यानंतर सर्वप्रथम कंपनीचे मालक श्री हरीषशी खंडेलवाल यांनी प्राध्यापकवृंद तथा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शब्द सुमनांनी स्वागत केले. तसचे कंपनीतील पदाधिकारी व कर्मचाऱ्यांचा परिचय करण्यात आला. कंपनीच्या स्थापनेपासून ते व्यवस्थापन कार्यासंदर्भात विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून थोडक्यात माहिती दिली.



कंपनीचे व्यवस्थापक श्री उत्तम पासवान यांनी कंपनीतील पाईप तयार करण्याच्या प्रोसेस संदर्भात तसेच पाईप तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल (Raw Matarial), तयार झालेल्या पाईप ची मार्केटींग पाईप तयार करण्यासाठी येणारा खर्च, पाईप कंपनीमध्ये असलेल्या मशीनी तंत्रज्ञान या संबंधीची इत्मभूत माहिती प्रत्येक पाईप उत्पादनात होत असलेल्या ठिकाणावर नेऊन सांगितले. विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकवृंदानी पाईप उत्पादना संदर्भातील माहीती समजून घेतली.



त्यानंतर विद्यार्थ्यानी कंपनीचे मालक **श्री हरीष खंडेलवाल** व व्यवस्थापक **श्री उत्तम पासवान** व **सुपरवाईजर गुड्डू** यांना काही प्रश्न विचारुन त्यांना असलेल्या शंकाचे समाधान करुन घेतले. कंपनीच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्याचे व प्राध्यापकवृंदाचे समाधानकारक उत्तरे देवून महाविद्यालयाच्या वतीने कंपनीचे मालक व पदाधिकाऱ्याचे आभार मानून विद्यार्थ्याच्या औद्योगिक भेटीचा एक दिवसाचा कार्यक्रम संपण्यिात आला.

अशाप्रकारे वाणिज्य प्राध्ययापवृंद व बि.ए. व बी.कॉम.च्या विद्यार्थ्यांची औद्योगिक भेट/सहल (Industrial Visit) आयोजित करण्यात आली. यामागील उद्देश विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष औद्योगिक माहीती व उत्पादन प्रक्रिया जानुन घेने त्यामुळे त्यांच्या अभ्यासक्रमास सहाय्यक ठराली. या औद्योगिक भेट/सहलीचा लाभ महाविद्यालयीन बि.ए. व बी.कॉम.च्या विद्यार्थ्यांनी घेतला.

.............................